**प्रेसनोट दि. १३/०६/२०१८**
**ज्येष्ठ नागरिक कक्ष,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**(Elderly Safety)(ज्येष्ठांची सुरक्षितता)**

**दि.३०/५/२०१८ व ३१/०५/२०१८** रोजी नवी दिल्ली येथे फिक्की (FICCI) Federation of Indian Chambers of Commerce and Industry या संस्थेव्दारे वेगवेगळया विषयांवर सर्व राज्यातील उपक्रमांचे अनुषंगाने Smart Policing Award चे आयोजन करण्यात आलेले होते. नमुद कार्यक्रमामध्ये **(Elderly Safety)(ज्येष्ठांची सुरक्षितता)** या विषयावरील अखील भारतातील महाराष्ट्र या राज्याचे व महाराष्ट्र राज्यातील पुणे शहर पोलीस या विभागाचे नामांकन झाले होते. त्या अनुषंगाने दि. ३०/५/२०१८ व दि. ३१/५/२०१८ रोजी नवी दिल्ली येथील (FICCI) चे कार्यालयात बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर कार्यक्रमाचे वेळी सर्व राज्याचे नामांकन झालेले प्रतिनीधी तथा मान्यवर उपस्थित होते. तसेच सदर पारितोषीकाचे वितरण मा. विजय गोयल, केंद्रीय मंत्री, नवी दिल्ली यांचे हस्ते पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे वतीने पोलीस उप आयुक्त, श्री पंकज डहाणे, गुन्हे शाखा, पुणे शहर, व पोलीस निरीक्षक स्वाती थोरात, यांनी पुणे पोलीस आयुक्तालयातील ज्येष्ठ नागरिक कक्ष, पुणे शहर या कक्षाच्या उत्कृष्ठ कामगिरीसाठी Smart Policing Award २०१८ अंतर्गत**(Elderly Safety)(ज्येष्ठांची सुरक्षितता)** चे पारितोषीक स्विकारले.

सदरचे Smart Policing Award ज्येष्ठ नागरिक कक्ष, पुणे शहर या कार्यालयास मिळाल्याने त्या अनुषंगाने दिनांक १३/६/२०१८ रोजी पोलीस आयुक्त कार्यालय येथे आयोजीत मासीक गुन्हे विषयक बैठक (क्राईम मिटींग) मध्ये मा. पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त गुन्हे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे उपस्थितीत ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या पोलीस निरीक्षक, स्वाती थोरात व पोलीस कर्मचारी सपोफौ.बोराडे, सपोफौ.शिंदे, सपोफौ.कांबळे, मपोहवा.जाधव, मपोहवा.गायकवाड, मपोहवा. स्वामी, पोहवा. चाबुकस्वार,मपोना.बारसकर व पोना.सोनवलकर यांचे मा.पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी अभिनंदन करुन कौतुक केलेले आहे.

(स्व. थोरात)